संवि १०२३

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ४४५

REFBK-0002336
REFBK-0002336

ग्रं. सं. ठाणें
४४५.

[redacted]



[redacted]

काव्य प्रसारक मंडळ.
ठाणे.

अत्यंत आदरपूर्वक

रा. रा. बहिरव गंगाधर अभ्यंकर

चिटणीस म. ग्रं. संग्रहालय, ठाणे

यांस सप्रेम भेट

दु. आ. तिवारी.

गो. गो. आधिकारी

दि. सी. वैद्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........

REFBK-0002336

REFBK-0002336

प्रख्यात महाराष्ट्र शाहीर रा. दु. आ. तिवारी यांच्या ऐतिहासिक व रा. गो. गो. आधिकारी यांच्या राष्ट्रीय कवितांचा एकत्र संग्रह.

---

# काव्यतुषार.


लेखक—

दु. आ. तिवारी.

गो. गो. आधिकारी.

( कमलावर )



प्रसिद्ध मिती.

गणेश चतुर्थी शके १८४५

ता. १४ सप्टंबर १९२३.


किंमत आठ आणे.

काव्य प्रसारक मंडळ.

प्रकाशक—

रा. दि. सी. वैद्य यानीं सदरहु पुस्तक
काव्यप्रसारक मंडळाकरता ठाणें येथें
काव्य प्रसारकमंडळाचे कचेरींत प्रसिद्ध केलें.

मुद्रक—

रा. सखाराम गोविंद विरकूड. B. A.
रवींद्र प्रिंटींग वर्क्स आंबेवाडी
'ई' ब्लाक—मुंबई.

काव्य ५५०

# काव्यतुषार

## अनुक्रमणिका

### दु. आ. तिवारी

| कवितेचें नांव. | पान. |
| --- | --- |
| १ महाराष्ट्रीय ... ... ... ... | १ |
| २ छत्रपतींचा मानभंग ... ... ... | ३ |
| ३ निर्वाणीची वाणी ... ... ... | ६ |
| ४ महाराष्ट्रीका ... ... ... ... | ८ |
| ५ वीरमाता व बंदिवान पुत्र ... ... ... | ११ |
| ६ तो काळ असता तर ... ... ... | १६ |
| ८ हें शिर लववेना माते ... ... ... | २१ |

### गो. गो. आधिकारी. ( कमलावर )

| | |
| --- | --- |
| ९ तेच का आम्हीं ? ... ... ... | २७ |
| १० महाराष्ट्र-गीत ... ... ... ... | ३१ |
| ११ नव्या युगाचे नवे जन ... ... ... | ३९ |
| १२ कृति शून्य देशभक्तास— ... ... ... | ४२ |
| १३ स्वस्थ कसे बसतां ... ... ... | ४५ |
| १४ आम्हींच ते मराठे ... ... ... | ४७ |
| १५ सखी सांत्वन ... ... ... ... | ५० |

भीड कुणाची नच येथें
पक्षहि नाहीं आम्हातें
सत्य जगीं ठाउक नुसते.

स्वतंत्र आम्ही जगांत आम्हा कोण कसे अडवीणार?
जुमानणारे कुणा न आम्ही—आम्हि मराठे शाहीर.

" कमलावर. "

काव्य
क्र.
आ.

दु॰ आ॰ तिवारी.

२३३८

# महाराष्ट्रीय.

(वृत्त-शा० वि० )

१

' काढी हात गळ्यांतुनी प्रियतमे ! कर्णा पहा गर्जतो
कोठें तें मम खड्ग ? आण, नृपती देशार्थ बोलावितो !'
संग्रामोत्सुक वीर जाय, ललना पाही गवाक्षांतुनी
देशोद्धारक वीरपुंगव असे गेले इथें गाजुनी.

२

स्वर्गाची अमरावती वसविली ज्यांनीं नगाच्या शिरीं
इंद्राच्या धनुराकृति उभिवल्या मालाहि दारावरी.
खालीं आणि वरी तसा दिशिदिशीं आनंद विस्तारिला,
त्यांचा वंशज–संघ हाय ! कलहीं कैसा रमूं लागला.

३

आले जीव मुठींत जे धरुनियां दिल्लीहुनी खालतीं
शस्त्रें टाकुन ते फकीर बनती भिक्षेसही लागती !
ज्यांनीं धाक असा रिपूस दिधला, गेले इथें शोभुनी.
नांवाचे दिसतात ते न दिसती योद्धे मराठे जनीं.

४

झाडींतून उफाळले, गिरिगुहा यांतून आले पुढें
हे पंचानन मावळांतिल जणो लंघून आले कडे
त्यांना पाहुनि शस्त्रही विसरुनी सेना परांची पळे
कोणाच्या स्मृतितून जातिल महाराष्ट्रीय ते मावळे.

५

द्वारीं मंडप पुत्रलग्नसमयीं घालावया लागले
तों आलें निजदेशकार्य पुढतीं, तैसेच ते धांवले
आधीं देश, पुढें स्वकार्य, वसते सद्भावना ही सदा
स्वार्थीं निस्पृह ते कुठें जन, कुठें हे प्रीय ज्या संपदा.

६

संग्रामीं लढतां असह्य बसला मर्मस्थळीं घाव तो
पुत्राला कथण्यास वीर निधनीं संदेश कीं धाडतो
" शूरांच्या सुकुलांत शूर निपजे दे प्रत्यया आणुनी "
बापामागुन पुत्र नातु खपले राष्ट्रीय संवर्धनीं.

# छत्रपतींचा मानभंग.

(श्लोक)

नाहीं मूषक डोंगरांतिल, म[illegible]ट्रीय शार्दूल हा
ऐसा प्रत्यय रामसिंह ! दिध[illegible] औरंगजेबास या.
राजा मानुनियां निमंत्रित [illegible]दासांत ठेवी मला !
“ गेहीं बोलवुनी अनाद[illegible] तो मूर्ख मूर्खांतला.” ॥१॥

आहे हा जहरी भुजंगम अ[illegible]ऊक होतें मला;
भोळे ते यशवंतसिंग ! मजला विश्वास त्यांनीं दिला.
याचीं गोड निमंत्रणें स्मरुनियां मी होतसें विस्मित !
“ वेळीं साखर पेरितो, रिपु खरा तो घातकी निश्चित.” ॥२॥

यानें बंधु निवारिले, जनकही बंदींत तो घातला !
मी माझ्या भुजविक्रमें प्रभुपणा लोकांत विस्तारिला !
यालाही मम कां नसेल कळली चित्तीं खरी योग्यता ?
मात्सर्यें स्वगुणाविना परगुणीं दृष्टीस ये अंधता.” ॥३॥

माझ्याशीं तह जाहला परिशिलें जैं सेवकाच्या मुखें,–
जो त्या मोदभरें ‘ नमाज ’ पढला निष्काळजीच्या सुखें—

४

झाडींतून उफाळले, गिरिगुहा यांतून आले पुढें
हे पंचानन मावळांतिल जणो लंघून आले कडे
त्यांना पाहुनि शस्त्रही विसरुनी सेना परांची पळे
कोणाच्या स्मृतिंतून जातिल महाराष्ट्रीय ते मावळे.

५

द्वारीं मंडप पुत्रलग्नसमयीं घालावया लागले
तों आलें निजदेशकार्य पुढतीं, तैसेच ते धांवले
आधीं देश, पुढें स्वकार्य, वसते सद्भावना ही सदा
स्वार्थी निस्पृह ते कुठें जन, कुठें हे प्रीय ज्या संपदा.

६

संग्रामीं लढतां असह्य बसला मर्मस्थळीं घाव तो
पुत्राला कथण्यास वीर निधनीं संदेश कीं धाडतो
"शूरांच्या सुकुलांत शूर निपजे दे प्रत्यया आणुनी"
बापामागुन पुत्र नातु खपले राष्ट्रीय संवर्धनीं.

# छत्रपतींचा मानभंग.

(श्लोक)

नाहीं मूषक डोंगरांतिल, महाराष्ट्रीय शार्दूल हा
ऐसा प्रत्यय रामसिंह ! दिधला औरंगजेबास या.
राजा मानुनियां निमंत्रित करी, दासांत ठेवी मला !
"गेहीं बोलवुनी अनादर करी तो मूर्ख मूर्खांतला." ॥१॥

आहे हा जहरी भुजंगम असें ठाऊक होतें मला;
भोळे ते यशवंतसिंग ! मजला विश्वास त्यांनीं दिला.
याचीं गोड निमंत्रणें स्मरुनियां मी होतसें विस्मित !
"वेळीं साखर पेरितो, रिपु खरा तो घातकी निश्चित." ॥२॥

यानें बंधु निवारिले, जनकही बंदींत तो घातला !
मी माझ्या भुजविक्रमें प्रभुपणा लोकांत विस्तारिला !
याळाही मम कां नसेल कळली चित्तीं खरी योग्यता ?
मात्सर्यें स्वगुणाविना परगुणीं दृष्टीस ये अंधता." ॥३॥

माझ्याशीं तह जाहला परिशिलें जैं सेवकाच्या मुखें,—
जो त्या मोदभरें 'नमाज' पढला निष्काळजीच्या सुखें—

माझा हा अपमान त्यास करण्या दुर्बुद्धि कां जाहली ?
" पश्चात्ताप न खोड मोडित असे जन्मस्वभावांतली. "॥४॥
आहे गांठ रणांत छत्रपतिशीं वार्ताच ऐकोनियां
चिंताक्रांत अशा यदीय बसल्या अंतःपुरांत स्त्रिया,
ते हे मोंगल! त्यांत काय मजला हें स्थान खालीं मिळे!
" राजर्षी असला तरी जळफळे तो मानभंगामुळें." ॥५॥
धेनुब्राह्मणपालनार्थ वळती जे हात खड्गाकडे
ते जोडून कदापि राहिन उभा मी ना अविंधापुढें !
याच्या दुष्कृतिचें पुढील भय म्यां गाडून तें टाकिलें !
"केतु ग्रासिल हा म्हणून रविनें त्याला कधीं वंदिलें ?" ॥ ६ ॥
वेऊं का वद रामसिंह ! इथुनी उड्डाण सिंहासनीं ?
पाडूं का उलथून यास अगदीं सिंहासनापासुनीं ?
येतो कोण मधें तयास बघतों आहे 'भवानी'करीं !
"अंतःशक्ति जयांत पूर्ण भरली तो का कुणा आवरी ? ॥७॥
डाळिंबास विदारुनि शुक करी निर्बीज ती पोकळी,
तैसे मारुनि हे अमीर करितों आतां सभा मोकळी !
पाडोनी तरु हे प्रभंजन जणों जातों निघोनि जवें !
"आवेशांत मनुष्य काय न करी कोणास हें सांगवे ? "॥८॥

तूं 'नाहीं' म्हणशी पुन:पुनरपी बा रामसिंहा ! मशीं
'सिंहाच्या सदनांत आपण उभे; ही वेळ आहे अशी !'
देतों सोडुनियां विचार परि ही धिक्कारितों मी सभा ?
'सिंहाच्याहि गृहांत व्याघ्र न कधीं कोल्ह्यांत राहे उभा !"॥९॥

निघुनि समरगाजी भूप गेला शिवाजी,
रिपु जरि इतराजी जाहला त्या समाजीं.
वदति कितिक तेथें एकमेकांस कानीं—
"सहन करित नाहीं मानभंगास मानी.'॥ १० ॥

# "निर्वाणीची वाणी !"

जेव्हां चोहींकडून आभाळ फाटलें तेव्हां ऐनगर्दीत तुकोजी शिंदे भाऊसाहेबास ह्मणाले—"महाराज ! क्षात्रधर्माची शर्थ झाली, याउपरी निघावें हें उत्तम आहे." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर-केलें"तुकोजीबावा ! आतां कोणीकडे जावें ? रावसाहेबांची (विश्वासरावाची) गत काय झाली ती पहावी ! आतां नानासाहेबांस तोंड काय दाखवावें ! शिवाय इब्राहिमखान गाडदी यास इमान दिलें तें काय ? तरी निघावें अशी गोष्ट कदापि घडणार नाहीं. रणाचे ठायीं ईश्वरसत्तेंकरून जें घडणार असेल तें घडेल, परंतु कदापि नामोहरम व्हावयाचें नाहीं !"

(गझल)

करोनी विजय घोषास—निघोनी जाय विश्वास.
अपेशी तोंड नानास—निघूं कां दाखवायास ?
इमानी गारदी खान—दिला त्या बेलभंडार
"जिथें ठासून राहाल—कतल मी तेथ होईन"
पहातो गोल बांधून—लढे या भाउचा प्राण
करोनी त्यासि बेमानी—ठरूं नामर्द बेमान ?
स्वतांच्या शौर्यधैर्यानें—परांना लेखिलें नाहीं

अतां कां पाठ फिरवूं मी ?–नका हे शब्द बोलूं ही !
फिराया कल्पना करितां–मला ‘ धिक्कार ! ’ ऐकूं ये
जणों तो शब्द अप्पांचा–नभीं तन्मूर्ति मी पाहे !
“निदानीं लेइजे प्राण–निदानीं देइजे प्राण”
असा हा मार्ग सोडून–निघावें केंवि येथून ?
भटांची ही पळी नाहीं–भटांचा हा असे भाला !
कुतर्की तुर्क वदतील–पळाला भट पळीवाला !
जयांच्या दर्भ हातांत–तयांच्या शौर्य रक्तांत
जगाला दाखवुन त्याच्या–भरूं द्या नवल नेत्रांत !
रिपूंनीं घातला घोळ–मला ना क्षिति भविष्याची
पुढें जो ठाकला काळ–करूं द्या पूर्तता त्याची !
फिका जो जाहला रंग–मराठी लाल पगडीचा
तियेला चढवितों रंग–रिपूंच्या लाल रक्ताचा !
कुलाच्या कीर्तिगंगेंत–स्वतांचें रक्त ओतीन
मराठी चमक दावोनी–समाधी तींत घेईन.

# "महाराष्ट्रिका"

( शा० वि० )

१

दास्याची निजजन्मभूमिचरणीं पाहोनियां शृंखला
दंडाया स्फुरलीं यदीय शरिरें त्वेषांत उच्छृंखलां
केल्या शौर्यबलें जिहीं गिरिगुहीं ताम्राननां भूमिका
जन्मा देउनियां अशा नरवरां गेल्या "महाराष्ट्रिका."

२

" प्राशी आत्मपया यथेच्छ तनया ! तज्जन्य रक्ताचिया—
संग्रामांगणिं बिंदुबिंदु सजणें देशार्थ गाळावया."
ज्या स्वांकाश्रयि बालकांस वदती मंदस्मिता मातृका
देशोद्धारिणि विस्मृतींतुन कशा जाव्या "महाराष्ट्रिका" ?

३

ज्यांचें शौर्य रणांगणीं बघुनिया स्वर्गीय संतोषती
घर्माचे मुखिं बिंदु ना, वरुनि तन्मोदाश्रु संवर्षती
त्यांचा वंशज तूं मुला ! न मळवीं, रक्षीं यशोमालिका
वीरांच्या उपदेशिका गृहिगृहीं होत्या "महाराष्ट्रिका."

४

शस्त्रें घेऊन, ओठ चावुन महासेना रिपूची चढे
कर्णी रायगडावरी प्रतिजवें संग्रामवाणी वदे
नाथें आवळितां कटी, असि करीं देती प्रिया सैनिका
'तारे' ते निजदेशभक्त गमती 'तारा' "महाराष्ट्रिका."

५

उत्कंठोच्छ्वसिताधरा करतलीं इंद्वानना ठेवुनी
येणाऱ्या जयनादिनी निरखिती सेना गवाक्षांतुनी
घेवोनी निजहस्ति पुष्परचिता माला स्वकांतोत्सुका
होत्या घालित नाथकंठिं मधुरा मुग्धा "महाराष्ट्रिका."

६

"नाथानें मम संगरांत पुढतीं केली महागर्जना"
"लावोनी ध्वज मत्सखा नगशिरीं तेथें करी घोषणा"
वार्ताल्हादिनि पद्मकांतवदना स्वामी यशोलापिका
होत्या ना चतुरा सरस्वति इथें धन्या "महाराष्ट्रिका."

७

ज्या गंगासलिलावगाहसमयीं बद्धांजलि प्राङ्मुखी
शीतप्रस्फुरितस्तनद्वयवती राष्ट्रोदयाच्या सुखीं—

स्वातंत्र्योत्तम मंत्रगीत जपती पुण्योत्तमा देविका
ही गोदा रडते परी न दिसती त्या त्या " महाराष्ट्रिका."

८

देवांचा पति तो शचीसच महासाध्वी म्हणोनी रिझे
संगीतज्ञहि चित्रसेन ललनारूपस्तुतीला सजे
दोघेही भजतात मौन, वदती वार्ता न पौराणिका
जों आल्या दिसुनी तदीय नयनीं रामा " महाराष्ट्रिका."

९

वृद्धेची सुतयाष्टि भग्न घडतां, ' देशार्थ गेली' म्हणे
कांतेचें पुसलेंहि कुंकुम, 'महाराष्ट्रार्थ गेलें' म्हणे
गंगाभागिरथीसमान असल्या कल्याणसंवर्धिका
होता सेवित छत्रपाल नृपती प्रेमें " महाराष्ट्रिका."

१०

व्योमस्पर्शी विशाल शैलशिखरीं सौराज्यलक्ष्मी जयें
प्रस्थापून विलोकनीय दिधलें ऐश्वर्य त्यांना स्वयें
तन्मातास्मृति या कृतज्ञ अचलां प्रत्यब्दि होऊन, कां
आलिंगून पयोधरास पुसती-- 'कोठें महाराष्ट्रिका?'

## "वीरमाता व बंदिवान पुत्र"

दा. क्र. २३३६

( दिंडी )

१

नको बाळा परतून नको पाहूं
बंदिशालेची भीति नको वाहू
टाक धैर्यानें पाय पुढें शूरा !
देशभक्तांना भूषविते कारा.

२

भूष्य होई जो भोसले कुलाला
तिलकवंशीं जो तिलकरूप झाला
इथें त्यांनींही धैर्य धरुन पोटीं
क्लेश साहियले जन्मभूमिसाठीं.

३

देशबंधूंच्या राज्यमनोवांच्छा
देशभगिनींच्या पुण्ययशःकांक्षा
तुझ्या हृदयावरि नाचतात त्यांतें
कसें बंधन करवेल कुणा हातें ?

४

ढाळ अश्रू, परि मातृभूमिसाठीं,
शोक कर तूं, परि देशबंधुसाठीं,
जननि भगिनी वा पुत्र सुता दारा
स्त्रवूं देऊं आम्हीं न अश्रुधारा.

५

आर्यपुत्रावरि शैलशिखर पात
घडो घडला जरि वज्रशस्त्रघात
जन्मभूमीची बंधमुक्ति व्हाया
अचल ठेविल तो धीर आत्मकाया.

६

तुझा एकहि निश्वास जरि सुटेल
दाह भारतहृदयास तो गमेल
आज दुःखाची मान पीळणारे
हवे खड्गावर वीर नाचणारे.

७

भीति देवाची एक असूं द्यावी
राष्ट्रकार्याला मान पुढें द्यावी

राजदंडाच्या भीषण प्रसंगीं
शिवो दुर्बलता ती न अंतरंगीं.

८

विषम विपदा कर्तव्यसदाचारी
असूं द्यावें परि हृदय धैर्यधारी
वेळ आली तरि सिद्ध हो मराया
नको सेवूं परि दास्य नरक वाया.

९

सिंह दुर्दैवें विजित जे जहाले
कधीं जेत्यांनीं मुक्त तयां केलें ?
निजोद्धाराच्या मार्गि सुमनमाला
कधीं जेत्यांनीं अंथरिल्या बाळा !

१०

तिरस्कारार्ह न नीतिभंग होई
दुराचारावर पद न तुझा वाही
राष्टसेवेला दोष मानण्याची
नीति चाले ही स्वार्थ परजनांची.

११

देशभक्तांचा घोर बंदिवास
सज्जनांचा छळ चालला उदास
अशा वेळीं परमेश होय जागा
अनीतीच्या फुलल्या न कुठें बागा.

१२

पुढें क्लेशाचे अभिनव प्रवेश
मनश्चितेचे विविध दुर्विलास
देहतापाची असहनीय बाधा
संकटांशीं दे झुंज खरा योद्धा.

१३

ओघ सुटला स्वातंत्र्यजान्हवीचा
घेइ आधार प्रथम शिवतनूचा
किती तेव्हां पाषाण मधें आले
तयां बुडवोनी ओघ पुढें चाले.

१४

मतिश्रेष्ठा ! अंधार कोठडींत
विश्व असुनी तिमिरांत जेथ लुप्त

काव्य ६९०


देशभक्तांचे कीर्तिकिरण तूंतें
शांति देतिल इतिहासमार्मिकातें.

१५

लढत असतां स्वातंत्र्यसंगरांत
शूर शिरले जे अमर मंदिरांत
पाठ देतिल, होतील भास त्यांचे
करी चिंतन तद्बोधरहस्याचें

१६

मला होइल जैं स्मरण तव कुमारा
तुझी आतांची मूर्ति ही गभीरा
तिला स्मरुनी वाटेल मला धन्य
वीर जननीचें भाग्य असामान्य.

# तो काळ असता तर—

१

जरी ते पूर्वीचे दिन भरतभूमीस असते
तिच्या कंठीं तेजें गुणि वरमणी जे विलसते
तिलाही ज्यांचें तैं अमित गमतें भूषण सदा
अहा ! आजी त्यांच्या मतिस जडली दास्य-विपदा.

२

जरी स्वातंत्र्याचा समय असता तोच रुचिर
तरी ज्यांची किर्ती असति 'नृपनीतिज्ञचतुर
पहा त्यांनीं बुद्धि-क्रय करुन अर्थित्त्व वरिलें
पराधीना-वृत्ती गुण विकसुं देईल न भले.

३

स्वशौर्यें संग्रामीं रविस रुधिरीं लुप्त करिती
स्वबाहू-सर्पाच्या विभविं उरगेशा नमविती
स्वराज्याच्या काळीं भरविति जयानंद-सरिता
स्वतांचीही त्यांना अवगति न येई निरवितां.

४

जिथें भूमातेचा नयन-जलबिंदूहि ठिपके
तिथें यत्क्रोधाचा अनल न बघाया रिपु शके.

पहा दुर्दैवाच्या गति पुढति एकेक सरती
रडे भूमाता ही, रडति सुत, ही कालमहती.

५

ग्रहज्ञानी शास्त्री, रणपटु, कलाविज्ञ, सुकवि
जगाची प्रत्येक भ्रुकुटि चढवी, शीर्ष डुलवी.
यदीया सौराज्यीं असति महती पूर्ण कळली
जसा वारा वाहे फिरविति तशी पाठ अपुली.

६

रडे भूमाता ही, कुणि म्हणती- हांसे; तरि खरें!
असे दुःखी, कोणी म्हणति- सुखि आहे; तरि बरें!
असे सत्यालापी नयन असतां अंध बनती
रहाती ती वेळा ठरति बुध ते निस्पृह-मति.

७

असे जे जे बंधू दिसति विगुणी दुःथितिमुळें
कुणी दोषो, त्यांना परि मति मदीया हळहळे
हिरे जातीचे जो असुन पिशुनीं काच ठरवी.
असो धिक् काळाला, उलट अजुनी चक्र फिरवी.

# "रणभूमि."

( दिंडी )

जन्मभूचें दुर्दैन्य निवाराया
सजलि ज्यांची शस्त्रास्त्रयुक्त काया
अशा शूरांची अंत्यशयन–भूमी
तिला पाहतसें साश्रु लोचनें मी.
शिंग भेरी डफ दुंदुभी नगारे
वाद्यघोषें समरङ्ग वीर सारे
जिथें गेले उडवून ते धुमाळी
तिथें नांदे अजि शांतता निराळी !
राउताला राऊत जैं मिळाले
समर धूलीचे लोट वर उडाले
तदा 'हर हर' जो वीर-घोष झाला
न ये श्रवणीं तो आज ऐकण्याला
शत्रु जरिपटक्यावरतिं धांव घेई
चपल खड्गांची होय हातघाई
गळे आर्यांचें रक्त पुण्यधामीं
तिथें बाष्पांजलि दीन अर्पितों मी.
जसा वृक्षीं द्विजनिवह तो उडावा
मेघधारांचा पात जसा व्हावा

तेंवि बाणांची तुमुलवृष्टि होतां
धैर्यशाली—पण झुंज देत होता.
शिरें लावुन आकाश तोलतील
वज्र पडलें स्थळ तरि न सोडतील
विजय मिळवावा, देह वा त्यजावा
इथें गेले प्रकटून वीरभावा.
करी वृष्टी उल्हाट-यंत्रमाला
जणो मेघांचा गडगडाट झाला
कोट छातीचा बांधुनी निघाले
स्वदेशाच्या कामास वीर आले.
शस्त्रभिन्ना विच्छिन्न तनु जहाली
रक्त वाहोनी येइ तिला ग्लानी
खड्गधारी तें अमरपुरीं गेले
इथें तद्यश चिर मात्र राहियेलें.
देशसेवाव्रत राष्ट्रभक्त शूर
समरशास्त्रप्रज्ञात भीम वीर
इथें निद्रा मात्रंकि ज्यांस लागे
कधीं होतिल ते वीर पुन्हां जागे ?

जेथ उत्कंठा भावना मनीषा
थोर अभिलाषा विजयमंगलाशा
शौर्य-धैर्यादि गुणगण प्रकाशे
तिथें भारत-भू टाकिते उसासे
खड्गधारी भट रुधिरलिप्त देही
जन्मभूमिस्तव जाहले विदेही
मेघरूपें येऊन पाहताती
बाष्पधारा गाळून परत जाती !

# "हें शिर लववेना मातें !"

"बाळ शिवबा ! तुला आग्रहानें दरबारीं नेलें पण तेथें तूं सुलतानाला सलाम केला नाहीं, ऐकत्यें !" असें वीरमाता जिजाईनें विचारल्यावरुन बालशिवाजी म्हणतातः—

१

होतात देउळें नष्ट—होतात देवता भ्रष्ट
धेनु ब्राम्हण ओरडती—धर्मावरतीं संकष्ट
न्याय नीति उरली नाहीं—सारेच भोगिती कष्ट
हा घोर मांडिला ज्यांनीं
त्यांच्यापुढतीं जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते !—हें शिर लववेना मातें !

२

तूं सांग ?—तुझ्याचरणाशीं—ही तोडुन ठेविन मान
तूं सांग ?—तात चरणांशीं—कापोनी ठेविन मान
गोब्राह्मण यांच्या करितां—खड्गावर ठेविन मान
परि परके सत्ताधारी
शिरुनी गृहिं झाले वैरी
बघतांच तयांना भारी
सक्रोध वृत्ति मम होते—हें शिर लववेना मातें !

जेथ उत्कंठा भावना मनीषा
थोर अभिलाषा विजयमंगलाशा
शौर्य–धैर्यादि गुणगण प्रकाशे
तिथें भारत-भू टाकिते उसासे
खड्गधारी भट रुधिरलिप्त देही
जन्मभूमिस्तव जाहले विदेही
मेघरूपें येऊन पाहताती
बाष्पधारा गाळून परत जाती !

# “हें शिर लववेना मातें !”

“बाळ शिवबा ! तुला आग्रहानें दरबारीं नेलें पण तेथें तूं सुलतानाला सलाम केला नाहीं, ऐकल्यें !” असें वीरमाता जिजाईनें विचारल्यावरून बालशिवाजी म्हणतातः—

१

होतात देउळें नष्ट—होतात देवता भ्रष्ट
धेनु ब्राम्हण ओरडती—धर्मावरतीं संकष्ट
न्याय नीति उरली नाहीं—सारेच भोगिती कष्ट
हा घोर मांडिला ज्यांनीं
त्यांच्यापुढतीं जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते !—हें शिर लववेना मातें !

२

तूं सांग ?—तुझ्याचरणाशीं—ही तोडुन ठेविन मान
तूं सांग ?—तात चरणांशीं—कापोनी ठेविन मान
गोब्राह्मण यांच्या करितां—खड्गावर ठेविन मान
परि परके सत्ताधारी
शिरुनी गृहिं झाले वैरी
बघतांच तयांना भारी
सक्रोध वृत्ति मम होते—हें शिर लववेना मातें !

३

मी म्हणतां " नाहीं नाहीं "–दरबारीं नेलें आई !
जों आंत शिरोनी पाही–तों चढून गेली भुंवई !!
मुजऱ्याला हात न वाही–शिर लववूं शकलों नाहीं !!!

हें सिंहासन कोणाचें ?
हें वैभव तरि कोणाचें ?
काहूर मनीं प्रश्नांचें

अपहारी नृपसत्तेतें–हें शिर लववेना मातें

४

एकटाच रात्रीं बसतों–जन्मभूमिला आठवतों
ढळढळा आइ गे ! रडतों–क्षणिं त्वेषानें संचरतों
झोंपेंत देशबंधूंच्या–दुःखानें दचकुन उठतों

बोलते भवानी " ऊठ ! "
बोलते जन्मभू " ऊठ ! "
'धर समशेरीची मूठ !'

अवमानुन त्या आज्ञेतें–हें शिर लववेना मातें !

५

देशाचा राजा नाहीं–राजनिष्ठ राहूं कैसा ?
धर्माचा राजा नाहीं–राजभक्त होऊं कैसा ?
उलट्या बोधाच्या गळिं हा–जीवाचा अडके मासा

नं. ..........

ज्या शिरीं भार देशाचा
ज्या शिरीं भार धर्माचा
कर्तव्यें वाहायाचा
विसरून देश-धर्मातें—हें शिर लववेना मातें.

६

स्वाभिमान सुटला ज्यांचा—देशभक्ति सुटली ज्यांची
कुलकीर्तीचा इतिहास—स्मृति देइ न उज्वलतेची
वाढवोत ते ते शोभा—दास्याच्या दरबाराची.
'उद्दाम' म्हणो कुणि मातें
कीं करोत उपहासातें
परि जागोनी स्वत्वातें
हिंदद्वेषी-तख्तातें—हें शिर लववेना मातें.

७

सुलतान जाहला क्रुद्ध--उमराव जाहले क्रुद्ध
जातिवंत झाले स्तब्ध--जनकही होय हतबुद्ध
परि तुझी आणि अंबेची--शिरीं कृपा असावी शुद्ध
मावळचे जमउन भाइ
स्थापीन मराठेशाही
हालवीन आदिलशाही
बोलतों सत्य जें गमतें—"हें शिर लववेना मातें !"

गो. गो. आधिकारी.

# तेच का आम्ही— ?

( चाल:–तूं टाक चिरुनिया मान...... )

चालता बोलताही । मनीं येई—
शिवरायांचे शूर मराठे तेच काय आम्ही ?
परदास्यिं मायभू बघणें
धिक् धिक् हें लाजिरवाणें
नरकांत जणूं तें जगणें
मृत्यु त्याहुनी बरा वाटला तेच काय आम्ही ?
जे कुणास नाहीं हरले
जे मरण-भीतिचे प्याले
शिशुपणापासुनी प्याले
तो समर-मृत्यु हा मोक्ष जयाना तेच काय आम्ही ?
घेउनी करी तलवार
वाजीवर होउनि स्वार
दिन रात्र सदा चौफेर
गस्त घालुनी राष्ट्र रक्षिलें तेच काय आम्ही ? २

जे स्वदेश उद्धारार्थ
सुख टाकुनि हातोहात
मारूनी घरावर लाथ
वेळिं अवेळीं धावुनि गेले तेच काय आम्ही ? ४
चंद्रिका जशी चंद्रास
जानकी जशी रामास
द्रौपदी जशी धर्मास
तशी प्यार समशेर जयानां तेच काय आम्ही ? ५
पूजणें तरी समशेर
खेळणें तरी समशेर
सोबती तरी समशेर
समशेरीविण जया न सुचलें तेच काय आम्ही ? ६
घेतील दुःख ओढून
देतील जिवाचें दान
त्यागतीलही प्रियकारिण
परि समशेर न त्यागायाचे तेच काय आम्ही ? ७
दिलदार गडी हृदयाचे
जागते दिल्या बोलाचे

२५५६



सोबती सकल विश्वाचे
म्हणुनि एकदा जगीं गाजले तेच काय आम्ही ? ८

समशेर जशी समरांत
जशि लक्ष्मी व्यापारांत
तशि ज्यानीं संसारांत
घरधनिण जिवाची पूज्य मानिली तेच काय आम्ही ? ९

फोडुनी शत्रुचे कोट
उध्वस्त करुनिया गोट
अटकेंत जयें बेझूट
जरिपटका जाउनी रोविला तेच काय आम्ही ? १०

अभिमानी जे भगव्याचे
सेवक जे जरिपटक्याचे
सत्पुत्र महाराष्ट्राचे
म्हणुनि एकदां जगीं गाजले तेच काय आम्ही ? ११

शिवबाच्या शब्दासाठीं
अपुल्या प्रिय धर्मासाठीं
जन्मसिद्ध हक्कासाठीं
गिरीकंदरीं वणवण फिरले तेच काय आम्ही ? १२

जळ जसें शुद्ध गंगेचें
तें तेज जसे बिजलीचें
कीं फूल जसे जाईचें
तशी जयांची नीति गाजली तेच काय आम्ही. १३

कां खालिं घालितां मान
कां हो कां धरितां मौन
देइल का उत्तर कोण
शिवरायांचे शूर मराठे तेच तेच आम्ही ? १४

मराठी ग्रंथ स... नं. ... ठाणे

# महाराष्ट्र-गीत.

( चालः–धन्य शिवाजी तो रण...........इ. )

सुंदर देशा ! पवित्र देशा ! भाग्यवान देशा !
मंगल देशा ! शिवरायाच्या महाराष्ट्र देशा !
कितिक नांदती जगांत राष्ट्रें परन्तु त्यांच्यांत
त्वन्नामाची स्फूर्तिदायक तडक न एकांत !
दगडहि उडती हवेंत सारे नाम तुझें घेतां
प्रेतें उठती भूमीमधुनी तव घोषा करतां
दाहि दिशांचे वारे सारे नाम तुझें गाती
पशुपक्षी त्वन्नाम जपोनी मोक्षाप्रति जाती
नामर्दांचे मर्द बनावे तव जय-घोषानें
तुला भिवोनी दूर सरावें तुजपासुनि अरिनें
( चालः– ) थोर तूं असा जगतांत । तुला भजतात ।
तुला स्मरतात
साधु संत लोकाग्रणी ।
ते सारे वीराग्रणी ।
तव दास स्वतां म्हणवुनी

मोहि म्हणावितो दास तुझा रे माझ्या राष्ट्रवरा !
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ॥ १ ॥
वीरवृत्तिचें रक्त खरोखर तुझ्यांत सळसळतें,
खऱ्या नीतिचें तेज तुझें हें जगास दिपवीतें,
हा जरिपटका श्रीमंती तव दावी हृदयाची,
भगवा झेंडा ओळख पटवी तुझ्या स्वभावाची,
तुझी प्यार तल्वार सांगते आजहि जगताला—
"महाराष्ट्र हा कलिकालासहि ना डरनेवाला;"
(चाल) तें निशाण स्वातंत्र्याचें । तुझ्या डौलाचें ।
तुझ्या कीर्तीचें
फडकतां नभोमंडळीं ।
तें पाहुनि तव रिपु-दलीं ।
भीतिनें जीव वर-खालीं ।
हाइ असे इतिहास सांगतो माझ्या राष्ट्रवरा !
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा. ॥ २ ॥
स्वातंत्र्यासम दुजें प्रिय तुला कांहिं नसे जगतीं
स्वातंत्र्यास्तव हरवशील तूं प्राण हतोहातीं;

सत्यपथें चालणें सदोदित ब्रीद तुझें गाजे
कृतिसम तुजला महाराष्ट्र हें नांव गड्या साजे;
तुझ्या प्रपंचा परमार्थाची असे सदा जोड;
संसारातुनि उलगडशी तूं मुर्दे जगत्कोड.
जिवाशिवाची भेट घडविणें हेंच तुझें ध्येय
आत्मा हा ब्रम्हांश जाणणें हेंच तुझें साध्य.
अन्यायाचें बंड मोडुनी सत्य स्थापावें
प्राणहि त्यासाठीं अर्पावा हेंच तुला ठावें;
( चाल ) पोवाडे तव धर्माचे। तुझ्या वेदाचे। उपनिषदांचे
ध्येयाचे तव किर्तीचे।
विद्वान सर्व देशीचे।
आनंदें गाती साचे
हिंदूधर्माचा तूं कलिजा माझ्या राष्ट्रवरा !
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा.॥ ३ ॥
जसा बोल तो तशीच करशी कृती सदा जगतीं
स्वर्गधरा करशील एक तूं दिल्या दिलासाठीं;
शरणागत शत्रूसहि म्हणशी अपुला प्यार सखा
तुला न ठावें कधीं काढणें उगाच बोल फुका;

शत्रूपाशीं खेळ खेळतां भाला—फेकीचा
मरण पावणें मार्ग दिसे हा तुला धन्यतेचा.
प्रिय जीवांचें करुनि खेळणें नश्वर जगतांत
संसाराचा थाट थाटसी सदा अनंदांत
जगांत नाहीं असा कुणीही घालिल तुज बंद
मायभुमीस्तव तुला सदाचा मरण्याचा छंद.
(चाल) ही तुझी मराठी बोली। कुणाच्या भाळीं।
नाहीं लाभली
तूं आनंदाची मूर्ती ।
तूं स्वातंत्र्याची मूर्ती ।
तूं शिवरायाची कीर्ति
दु:खें पळती सैरावैरा नाम तुझें घेतां ।
स्वीकारी या शाहीराचा हा मुजरा आतां ॥ ४॥

ज्याच्या पुण्यप्रतापयोगें मराठमोळ्याला
वीर-वृत्तिचा मान मिळाला त्या शिवबाळाला,
तो संताजी वीर धनाजी मुरार बाजी तो,
तान्हाजी तो बाजि, चिमाजी राघुभरारी तो

दत्ताजी तो महादजी तो गोखलखांही तो
ज्याचा विक्रम आजहि अमुचे बाहू स्फुरवीतो,
खूप शर्थिनें राज्य रक्षिलें मराठिशाहीचें
कलम धरोनी तेज दाविलें भगव्या झेंड्याचें
तो मुत्सद्दी नाना तैसा तिलकप्रभु अमुचा
कीर्तिध्वज या अखंड भुवनीं फडफडतो ज्याचा,
(चाल) या साऱ्या नररत्नास । वीर योद्धयांस । देशभक्तांस
जन्मेर तूंच दिधलास ।
आपलें तया म्हटलेंस ।
तज्जन्म धन्य केलास
मीहि जन्मलों तुझ्याच उदरीं माझ्या राष्ट्वरा
स्वीकारी या शाहिराचा हा प्रेमें मुजरा ॥ ९ ॥

रायगडाचें उघडें सारें भयाण मैदान
पाहुनि होइल कोण मराठा जो न उदासीन ?
प्रतापगडचें स्थान पूज्य तें कोण न पाहोनी
जगदंबेची करुणा भाकिल दुःखित हृदयानीं ?
श्रीमंताच्या श्रीमंतीचें पठार पाहून
ढाळणार ना ढळढळ अश्रू कोण असा कोण ?

रायगडाचे प्रतापगडचे पन्हाळगडचेही
पुरंदराचे सज्जनगडचे सिंहगडाचेही
दगड हडाचे वीर छातिचे बुरूज झुंझार
दुःखाचे निश्वास सोडिती बघ वारंवार
( चाल ) "ही काय ग्रहदशा आली। अशा या कालीं।
बापुडी झाली
हिंद-भूमाय ही अपुली।
राहिला न तिजला वाली"।
गाती ते गाणीं असलीं
मीही त्यांसह साथ करिन हो माझ्या राष्ट्रवरा !
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ॥ ६ ॥
पावनखिंडींमधें बसोनी स्वामिभक्त बाजी
जिजाइ आईच्या सिंहगडी बसोनि तान्हाजी
हाक मारती या कोणी हो उठा कुणी आतां
आर्यभूमिच्या मायभूमिच्या स्वातंत्र्याकरतां;
पानपताच्या रणभूमीवर हांक अशी येते—
"या हो सारे वीर मराठे कां बसलां नुसते.
विश्वासासह मी--भाऊ-ही पुनरपि येईन
हा दत्ताजी हा जनकोजी यांना घेऊन"

शर्थ करू या पुनरपि आपण स्वातंत्र्यासाठीं
मायभूमिच्या हिंदभूमिच्या उद्धारासाठीं
(चाल) ही पुरे जाहली नीज ! कराया काज।
धरा हो लाज
कां स्वार्थास्तव धडपडतां।
दरदास्यि हिंदभू असतां।
तत्पुत्र स्वतां म्हणवीतां
मीही त्यासह साथ करिन हो माझ्या राष्ट्रवरा !
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ! ॥ ७ ॥

गेले कोठें आज गूण ते तुझे महाराष्ट्रा !
परक्यादारीं पाणी भरते तुझी हिंदमाता !
अपमानाचा मान मिळे तुज घडोघडीं आज
वाटूं दे रे तुझ्या मनाला थोडि तरी लाज !!
शिवरायांची शिकवण कैशी स्मरणातुनि गेली ?
समर्थवाणी अध्ययनाच्या आड कशी झाली ?
स्वातंत्र्यप्रियवृत्ति आजला कुठें तुझी गेली ?
मुर्दाडाची परवशता ही तुला कशी रुचली ?

अपमानाची सदा सलामी आज तुला मिळते
पारतंत्र्य–पंकांत मायभू पहा तुझी रडते !
( चाल ) हो रे हो जागा अजुनी । तुला या अवनीं ।
कोण ना मानी
जग दणाणुनी जाऊं दे ।
हैराण रिपू होऊं दे ।
स्वातंत्र्य परत येऊं दे
गाइन मग मी तुझें पवाडे महन्महाराष्ट्रा
स्वीकारी या शाहीराचा हा मुजरा आतां ॥८॥

# नव्या युगाचे नवे जन

काठोकांठ भरूं द्या पेला फेस भराभर उसळूं द्या
नव्या युगाचे तुह्मीं नवे जन हें जगताला समजूं द्या

१

सर्व जगावर करा कडी
नव्या युगीं घ्या नवी उडी
घडवा या हो नव्या रुढी

वास येथचा स्वर्गसुखासम सकलांनाही वाटूं द्या—
नव्या युगाचे नवे तुह्मी जन हें जगताला समजूं द्या.

२

ही विधवा रडते इकडे
कान जरा द्या तिच्याकडे
ऐकुनि घ्या मग बोल खडे

अर्थ तयांचा ध्यानिं घेउनी कृतीमधें तो उतरूं द्या
नव्या युगाचे नवे तुह्मीं जन हें जगताला समजूं द्या.

३

बटिक नव्हे स्त्री ही तुमची
अधार ती संसाराची
जिवंत मूर्ती सौख्याची

हिंद-महीला सकल जगाला आदर्श अशी होऊं द्या
नव्या युगाचे नवे तुम्ही जन हें जगताला समजूं द्या.

४

जातीवर श्रेष्ठता नसे
ती तर ज्ञानावरति असे
तत्व असें विसरतां कसें ?
कसली अस्पृश्यता मानितां चोहिकडे समता वरुं द्या—
नव्या युगाचे नवे तुम्ही जन हें जगताला समजूं द्या.

५

कसास लावुनि जुनें नवें
पारखुनी नाणें घ्यावें
सांगाया हेंहि कां हवें,
जुनें तेवढें सोनें मानुनि हंसें न अपुलें करुनी घ्या ! !
नव्या युगाचे नवे तुम्ही जन हे जगताला समजूं द्या.

६

रूढींचीं शकलें उडवा
शास्त्र-पुराणें तीं दडवा
जुन्या स्मृत्या पायीं तुडवा

नरनारी दोघांसहि जगतीं जीवित सुखकर होऊं द्या.
नव्या युगाचे नवे तुम्ही जन हें जगताला समजूं द्या.

७

पुरे चघळणें जुनीं हडें,
फेंका दृष्टी जगाकडे,
सद्धर्माचे घ्याच धडे,
जिकडे तिकडे जगतावरती हिंदुधर्म हा पसरूं द्या.
नव्या युगाचे नवे तुम्ही जन हें जगताला समजूं द्या.

# कृतिशून्य देशभक्तास-

( चालः-काठोकांठ............इत्यादि. )

× × ×

बोलायाचें एक आणखी कृतींत दुसरा आचार
अशा कृतीनें कसा सांग रे व्हायाचा राष्ट्रोद्धार.
तोंड दिले देवाजीनें
म्हणुनी का ज्यानें त्यानें
कृतीविहिन उपदेशानें
आस धरावी राष्ट्र आपुलें श्रेष्ठ कराया जगावर
अशा कृतीनें कसा सांग रे व्हायाचा राष्ट्रोद्धार ? १
कोंडाणा हा बघ इकडे
रांगणगड हा बघ तिकडे
बघ साऱ्या या गडाकडे
बुरुज तेथचें तुला सांगतिल एकवार कां शतवार
होइल कैसा शिवरायांच्या आर्यभूमिचा उद्धार. २

इतिहासाचें बघ पान
रुधिरानें भिजलें रान
धुंड एकदा जाऊन
अदृष्यांतिल जीव चिरंजिव दऱ्यांतुनी बघशील तर
सांगतील जा कसा करावा आर्यभूमिचा उद्धार. ३

शूर वीर जे तोंडानें
भ्याड परन्तू जे कृतिनें
देशघात जे जगल्यानें
ही बघ त्यांच्या—त्यांच्यासाठिंच—टकमक अगदीं तय्यार.
कथील जा वर क्षणांत तुजला होइल का राष्ट्रोद्धार. ४

बोलायाचें एक परी
करावयाची कृति दुसरी
आस खरी ना हृदंतरी
असे तुझ्यासम नीच लोक जे—स्पष्टसांगतों—खरोखर
त्यांनिं बुडविलें राष्ट्र आमुचें कसला रे राष्ट्रोद्धार! ५

स्वार्थासाठीं हा खेळ
कसा पडावा मग मेळ
जिकडे तिकडे कल्लोळ
जो तो अपुल्यासाठिंच खपतो, मरतो मग का होणार
अशा कृतीनें शिवरायांच्या आर्यभूमिचा उद्धार ? ६
स्वार्थासाठीं खपणारे
मानासाठीं मरणारे
कृतीविहिन जे वदणारे
चढवूं आम्हीं जर का त्यांना पहिल्यानें त्या सुळावर
खचित सांगतों क्षणांत होइल आर्यभूमिचा उद्धार. ७

# स्वस्थ कसे बसतां ?

( सबसे राम भजन करलेना—इत्यादि. )

आर्यभूमिच्या प्रिय बाळानों
स्वस्थ कसे बसलां रे सारे ॥ धृ० ॥

हिंदुस्थानीं जन्म पावलां
थोर तुम्हीं जन भाग्याचे !
हाय, परन्तू काय आजवर
सार्थक केलें हो त्याचें ? ॥ १ ॥

सर्व जगाहुनि तुम्हांस भारी
मर्दुमकी गाजविण्याला
परमेशानें दिलें रणांगण
कां चुकतां कर्तव्याला ? ॥ २ ॥

खावें प्यावें आणि निजावें
चोज करावें जीवाचें
बोला हिंदजनांनों ! बोला
ध्येय हेंच का हो तुमचें ? ॥ ३ ॥

मानव-देही पशू परन्तू
ठराल ऐशा कृतिनें रे !
नरयोनींमधिं जन्म पावलां
ठेवा हें ध्यानांत पुरें ! ॥ ४ ॥

पहा उलटुनी पान मागचें
जरा तरी इतिहासाचें
दिसतिल तेथें धडे घालुनी
दिले तुम्हां कर्तव्याचे ॥ ५ ॥

कोण तुम्हीं हें जाणुनि अपुलें
टाका पुढचें पाऊल
पुरे पुरे या पुढें पुरे हो
झाली तितुकी ही भूल ! ॥ ६ ॥

जन्मापासुनि जिनें पोशिलें
वाढवील ही जी पुढतीं
मायभूमि ती कशी विसरलां
धरा लाज तरि हो चित्तीं ॥ ७ ॥

# आम्हीच ते मराठे

( चालः—आनंदकंद ऐसा.........इ० ).

जगतास जिंकणारे—
आम्हीच ते मराठे !
सात्वीक शान्ततेनें—
सात्वीक प्रेमदानें
हे विश्व पोसणारे—
आम्हीच ते मराठे !
भीती न ज्यां जगाची,
भीती जगास ज्यांची
काळाशि खेळणारे—
आम्हीच ते मराठे !
दुर्दैव आड येवो,
लक्ष्मी त्यजोनि जावो
सद्धर्म रक्षणारे—
आम्हीच ते मराठे !
कर्तव्य पालनांत,
स्वातंत्र्य रक्षणांत,

दुःखाशि हांसणारे–

आम्हीच ते मराठे !

या आर्य–भूमिसाठीं

या हिंदभूमिसाठीं

सर्वस्व सोडणारे–

आम्हीच ते मराठे !

खड्गाशिं खेळण्यांत,

मृत्यूशिं झुंजण्यांत,

आनंद मानणारे–

आम्हीच ते मराठे !

जेथे मिळेल तेथें

अत्यंत शुद्ध चित्तें

प्रेमास पूजणारे–

आम्हीच ते मराठे !

वागेल जो अम्हांशीं

जैसा, तसे तयाशीं

निःशंक वागणारे—
आम्हीच ते मराठे !
आकाश कोसळूं द्या,
हा गोल गड्गडूं द्या,
शब्दास जागणारे—
आम्हीच ते मराठे !
ध्यानीं मनीं जनांत,
दुःखांत वा सुखांत,
हा एक मंत्र गा रे,
" आम्हीच ते मराठे "

# सखीसांत्वन

का आज तुझें गे खिन्न वदन हें झालें ?
कां—कधीं मृत्युला वीर मराठे भ्याले !
जर विजयि जाहलों येइन मी भेटाया
पुरवीन हौस ती अर्पुनि तुजला काया !
जर लढत लढाई मरण पावलों त्यांत
तर आनंदानें जाइन मी स्वर्गांत !
तुज कळेल जेव्हां माझी ही रणवार्ता
तूं तशीच निघुनी वर ये प्रीतीकरतां !
संसार थाटुनी गोड—सुंदरी !
पुरवीन मनींचें कोड—सुंदरी !
कां चिंता करशी व्यर्थ सुखाची चित्तीं
सुख कुठें पळालें ? तें तर अपुल्या हातीं

२३३६५०

REFBK-0002336
REFBK-0002336